## क्रेडिट कार्ड नको रे बाबा

# क्रेडिट कार्डचा भूलभुलैया

- क्रेडिट कार्ड म्हणजे काय व त्याचे कायद्यात स्थान काय?
- क्रेडिट कार्डचा सदुपयोग.
- क्रेडिट कार्डबाबत बँक आपल्याविरुद्ध कोर्टात जाऊ शकते का?



ॲड. अरुण गो. देशमुख

# मनोगत

क्रेडीट कार्डाचा भुलभुलैयाचे पुस्तक हे माझे कायद्याविषयक सहावे पुस्तक. पोलीस, कायदा आणि अटक ह्या पुस्तकाच्या यशस्वी वाटचालीमुळे विविध कायद्याविषयक विषयांवर पुस्तके लिहिण्याचा योग आला त्यातीलच एक म्हणजे प्रस्तुत क्रेडीट कार्डचा भुलभुलैया हे पुस्तक.

क्रेडीट कार्डाचा भुलभुलैया या विषयावर पुस्तक लिहिण्याचे प्रमुख कारण म्हणजे जरी आपण माहितीच्या युगात वावरत असलो तरी क्रेडीट कार्डसारख्या विषयाबाबत आपल्यालाच काय यातील तज्ज्ञांनाही याबाबत विशेष माहिती नसलेली मला पहावयास मिळाली. ज्याला रूढार्थाने प्लास्टिक मनी म्हणतात त्या क्रेडीट कार्डाचे त्रस्त धारक मी पाहातो. त्यांना खऱ्या अर्थाने त्यातून बाहेर पडण्याचा कोणी मार्गच दाखवताना दिसत नाही. क्रेडिट कार्डच्या कंपन्यांचे एजंट खरेतर क्रेडीट कार्ड सामान्यांच्या गळ्यातच मारत असतात. अनेक दूरध्वनी करीत, मागे लागत, आपले क्रेडीट कार्ड इतरांपेक्षा किती चांगले आहे, ग्राहकाची किती सोय होणार आहे हे सांगत किमान परिचय देणाऱ्या गोष्टी दाखवल्या की क्रेडीट कार्ड तुमचेच असे सांगितले जाते. जो ह्या भूलथापांना आपल्या गरजा न समजता बळी पडतो त्याला क्रेडीट कार्ड कसे वापरावे याबाबत योग्य माहिती दिलीच जात नाही.

खरेतर क्रेडीट कार्ड वापरले की विहित दिवसांच्या आत ते पैसे भरले तर फक्त वर्षाचे शुल्क ग्राहकाला पडत असून ही एक चांगली सोय आहे व बहुतांशी परदेशात याबाबत सढळपणे वापर केला जात असतो. मात्र परदेशात व आपल्या देशात फरक असणारी एक प्रमुख गोष्ट म्हणजे क्रेडीट कार्डच्या ग्राहकाला आपल्या देशात आर्थिक शिस्त नाही. परदेशात क्रेडीट कार्डच्या ग्राहकाने पैसे थकवले व/वा बुडवले तर त्याला इतर बँकांकडून क्रेडीट मिळणे दुरापास्त होते कारण कुठल्याही एका बँकेने त्याला काळ्या यादीत टाकले तर तो सर्वांच्याच काळ्या यादीत जातो. आपल्या इथे मात्र हे अभावानेच दिसते. इथे क्रेडीट कार्डच्या ग्राहकाने पैसे थकवले व/वा बुडवले तरी त्याला बँकांच्या नफेखोरीच्या स्पर्धेमुळे लागलीच दुसऱ्या बँकेकडे क्रेडीट कार्ड उपलब्ध होते. आणि यामुळेच आर्थिक शिस्त बिघडते.

याच बरोबर आपल्या देशात क्रेडीट कार्डविषयी योग्य माहिती दिलेली नसल्यामुळे विहित वेळेनंतर किंवा बँकेचे पत्र आल्या नंतरच क्रेडीट कार्डचे ग्राहकांना पैसे भरण्याबाबत आठवण होते. खरे तर महिन्याला क्रेडीट कार्डचे क्रेडीट किती दिवस वापरले त्याप्रमाणे व्याज सुरू झाले असते व ह्या ग्राहकाला वाटते की आपण तर आता पैसे भरले आता काहीच बाकी नाही. मात्र प्रत्यक्षात पैसे जरी भरले तरी तिथंपर्यंतचे बाकी व्याज हे पहिले त्या पैशातून वळते केले जाते आणि मूळ रक्कम तशीच राहते. त्यामुळे पैसे भरणे बाकी आहे असे कायमच दिसते. आणि यातही गंमत म्हणजे क्रेडीट कार्ड वापरण्याचे मासिक शुल्क, बाकी रक्कमेचे मासिक व्याज असे दर महिन्याला रक्कमेत वाढ होत जाते... आणि सात-आठ महिन्यानंतर बँक ग्राहकाला प्रेम पत्र पाठवून पैशांची थकबाकी कळवते. ज्यामुळे ग्राहकाची भावना बनते बँकेने आपल्याला फसवले आहे ह्याचीच... व तो इतरांना क्रेडीट कार्ड वापरणे वाईट असल्याचे मत मांडत जातो व एक चांगल्या उपलब्ध सोयीचे खऱ्या अर्थाने कडबोळे होते.

क्रेडीट कार्डच्या थकीत पैसे वसूल करण्यासाठी बँकांच्या वसूली अधिकाऱ्याचे पत्र, मांडवली करण्यासाठी भेटण्यासाठीचे दूरध्वनी, वकीलाच्या नोटीसा पाठवण्यापासून अगदी घरी भाड्याचे गुंड पाठवण्यापर्यंत बऱ्याच बँकांची मजल गेलेली आहे. अर्थात याबाबत सरकारी दरबारी कडक ताशेरे असतानाही दुर्दैवाने अजूनही काही बँका गैरमार्गाने वसूली करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. क्रेडीट कार्डची सोय देणाऱ्या बँका म्हणजेच आजच्या युगातील सावकार ही भावना का झाली आहे याबाबत बँकानीही योग्य विचार करण्याची वेळ आलेली आहे. नफेखोरीसाठी चांगल्या गोष्टीचे कडबोळे होणे निश्चितच वाईट आहे... असो.

या पुस्तकासाठी मी अनेक वकील मित्रांशी बोललो. बहुतेकजण एक तर क्रेडीट कार्डपासून लांब अंतर ठेवून असतात किंवा त्याबाबत त्यांना निश्चित संपूर्ण माहिती नसते. जुजबी माहितीच्या आधारेच चर्चा होत राहाते. मात्र बहुतेक सर्वांनी या विषयावर तू माहितीपूर्वक पुस्तक काढीत आहेस हे चांगले असल्याचे सांगितले.

या पुस्तकात नुसतेच क्रेडीट कार्डच नाही तर बँकांच्या व्यवहारातील इतर प्लास्टिक मनीबाबत मी प्रयत्नपूर्वक समावेश करून सर्वांची प्राथमिक माहिती वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, ई-बँकींग... अशा सर्वांची माहिती, तुलना,

आवश्यकता दिलेली आहे. असो.

आपल्यासमोर क्रेडीट कार्डाचा भुलभुलैया वरचे हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद वाटत आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या पत्नी व आईचे या पुस्तकाद्वारे मी ऋण व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रणदोष श्री. अरविंद कर्वे यांनी पाहिलेले आहेत. सदर पुस्तकास दोन शब्द महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विधी व जनहित कक्षाचे अध्यक्ष ॲड. पराग प्रधान यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकातील अनेक बाबी माझ्या मित्रांनी अनुभवल्या आहेत आणि त्यामुळेच त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांचा उपयोग या पुस्तकासाठी मी केलेला आहे. यात अनेकांनी त्यांचे आलेले अनुभव सांगितल्यानेच हे पुस्तक परिपूर्ण करू शकलो. त्या बाबतीत मी या सर्व संबंधित मित्र मंडळींचा आभारी आहे.

हे पुस्तक लिखाण करण्याची संधी मला मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांचेमुळे मिळाली असून त्यांच्या ह्या पाठिंब्यामुळेंच मला ही साहित्य सेवा अखंडीत चालू ठेवता येते आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

हे पुस्तक बँक व्यवहारात सामान्य व्यक्तिसाठी नक्कीच उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

ॲड. अरूण गोविंद देशमुख

प्रकरण - १

# पैसे व त्याची बदलती माध्यमे

## अ. पैसे व त्याचा संक्षिप्त इतिहास

पैसे म्हटले की भारतीयांच्या डोळयासमोर येतात एक तर नाणी नाहीतर कुठेतरी १०० ची नोट, ज्यावर एका वाजूला रिझर्व बँकेचा गव्हर्नर म्हणत असतो की मै धारक को एक सौ रूपये अदा करने का वचन देता हूँ। ( म्हणजेच मी या नोटेच्या धारकाला १०० रूपये देण्याचे वचन देतो ) तर महात्मा गांधींचे ठळक चित्र व वॉटर मार्कही गांधींचाच. असो. खरे तर पैसे म्हटले की माझ्यासमोर विविध देशांची नाणी वा नोटा नजरे समोर येतात. पैसा सर्व जगाला एकप्रकारे स्वत:भोवती नाचवत असतो. आणि याचमुळे की काय अनेकांना असे वाटत की कुठे परिस मिळावा ज्याने आपण सहज लोखंडाचे सोन्यात रूपांतर करू शकू किंवा आपल्या दारात एक पैशाचे झाड उगवावे. पण तसे कधीच होत नाही. या कविकल्पना म्हणून ठिक आहेत.

पैसा हे देशासाठी, समाजासाठी, वैयक्तिक संस्था वा माणसांसाठी एकप्रकारे देवाणघेवाणासाठी माध्यम म्हणून काम करत असतो आणि हेच त्याचे समाजासाठी विशिष्ठ काम ठरते. पैसे हे व्यवहाराचे एक अविभाज्य माध्यम आहे. ज्या ज्या वेळी पैशाच्या बदल्यात काहीच मिळेनासे होते तेव्हा त्या वरचा लोकांचा व समाजाचा विश्वास उडू लागतो. अगदी ताजे उदाहरण म्हणजे मध्ये ५०० च्या अनेक खोट्या नोटा चलनात आलेल्या होत्या. तेव्हा हे नक्की होते की नोटा काही फक्त ५०० च्याच खोट्या नव्हत्या तरीही

५०० ची नोट पाहिली की सामान्याच्या पोटात धडकी भरायची. कारण सहजरित्या प्रत्येकजण ती नाकारायची. अगदी सरकारी कार्यालयातही ती स्वीकारताना तुमचे नाव त्या नोटेच्या क्रमांकासहीत लिहून ठेवायचे. त्यामुळे झाले असे की सर्वजण ५०० ची नोट टाळत होते. रशियात काही वर्षांपूर्वी असेच घडले. बादलीभर पैसे घेऊनही साधा खाण्यासाठी पाव मिळेना तेव्हा त्या परिस्थितीत पैशांवरचा विश्वास लोकांचा उडाला.

आपल्या देशातच काही दशकापूर्वी चलनातील ५००० व १०,००० च्या नोटा बाद करण्यात आल्या. हा निर्णय काळा पैसा बाहेर येण्यासाठी होता. मात्र त्यावेळेला ज्यांच्याकडे त्या नोटा होत्या त्यांची अवस्था बिकट होती. वृत्तपत्रात तर काहीजण त्या १०,००० नोटेची सुरकांडी करून त्यात तंबाखू भरून सिगारेट शिलगवतानाची बातमी आली. त्यामुळे जिथंपर्यंत पैसे हे व्यवहारात विश्वासाने दिले घेतले जातात तिथंपर्यंत ते चलनात राहत असते.

पैसे हे या ना त्या रूपात इसवी सन पूर्व ५००० पासून अस्तित्वात आहे. अगदी सुरूवातीस बार्टर पद्धत चालायची. ज्यात वस्तूच्या बदल्यात वस्तू दिली घेतली जायची. मात्र यात अनेक अडचणी यायला लागल्या त्यामुळे वस्तूचे मूल्यमापन करण्यासाठी चलन म्हणून त्या त्या वेळेच्या टोळ्यांनी व नंतर राजे-महाराजांनी स्वत:ची नाणी टाकसाळीतून तयार करीत चलनात आणली. दगडाच्या नाण्यापासून सोन्याच्या मोहोरांच्या नाण्यापर्यंत बदलत जाणाऱ्या या चलनाचे स्वरूप सातत्याने बदलत आहे. किंबहुना आजही बदलते आहे. कालानुरूप नाणी मागे पडत नोटा आल्या. तर आजच्या काळात प्लास्टिक मनीने बाजाराचा कब्जा घेण्यास सुरूवात केली आहे. प्लास्टिक मनीला भारतात हळूहळू मान्यता मिळू लागली असून यापुढची काही माध्यम उदा. इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींगचेही स्वागत होऊ लागले आहे.

## ब. पैसे देवाण-घेवाणचे माध्यम

पैशाचे महत्त्व म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारासाठी त्याचा होणारा उपयोग. पैशाशिवाय जगात खरेदी विक्री अवघड होईल. गाढव विकणाऱ्याला ५ किलो तांदूळ पाहिजे असल्यास तो गाढवाचे काय पाय कापून तांदूळ घेणार? आणि जरी घेतला तरी नंतर त्या गाढवाचा त्याला काय उपयोग राहाणार ? तसेच एक निर्जीव पाय घेऊन तांदूळ देणाऱ्यालाही काय मिळणार ? व त्या पायाचे मूल्य कसे काय ठरणार ? त्यामुळेच दोन्ही गोष्टींचे मूल्यामध्ये

म्हणजेच पैशात रूपांतर केले तर प्रत्यक्ष व्यवहार करण्यास सोपे जाते.

### क. पैसे किंमत ठरवणारी व बाळगणारी वस्तू

एकाच प्रकारच्या दोन वस्तू पण कमी जास्त दर्जाच्या असतील तर त्यांच्यात तुलना कशी होणार ? शब्दाने जास्तीत जास्त छान, फारच छान अशा उपमा दिल्या जाऊ शकतात. किती छान याचे उत्तर देता येत नाही. माझा पेन १०० रूपयाचा आहे असे म्हटले की दुसऱ्याकडे असणाऱ्या १० रूपयाच्या पेनाशी त्याची तुलना सहजगत्या करता येते. तीच गोष्ट विशिष्ठ बाजारात असणारा माल हा स्वस्त आहे हे आपण पैशात त्याचे मूल्यमापन केले तरच ठरवता येते. त्यामुळे पैसे हे किंमत ठरवणारे व बाळगणारे असे चलनाचे एक माध्यम ठरते.

### ड. पैसे वस्तू वा सेवेच्या बदल्यात देता येणारे चलन

जर पैसे नसतील तर घेतलेल्या सेवेच्या बदल्यात त्या व्यक्तिस कोणती गोष्ट देणार हा अडचणीचा प्रश्न उरला असता. वकीलास त्याच्या कामाचे बदल्यात तुम्ही तुमच्याकडचे जरी गहू दिले तरी त्याला ते नको असेल तर देवाण घेवाण होणार कशी ? आणि म्हणूनच पैसे हे या ठिकाणी वस्तू वा सेवेच्या बदल्यात सहजरित्या देता येणारे चलन असल्याने सर्वांना सोईचे ठरते.

### इ. पैसे – कायदेशीर मान्यता

पैसे हे कोणालाही घरी तयार करता येत नसून त्या त्या देशातील सरकारतर्फे ती चलनात येतात. त्यामुळे सदर पैशास त्या त्या देशात कायदेशीर मान्यता असते. सदर पैशाची जबाबदारी शेवटी त्या त्या देशातील सरकारचीच रहाते.

### फ. पैसे – सर्वसाधारणपणे ओळखले जाणारे चलन

पैसे सहजरित्या ओळखता येतात. १०० ची नोट व ५०० ची नोट लहान मुलगाही ओळखू शकतो. जर पैसे नसेल आणि समजा घोडा चलन म्हणून वापरायचे ठरवले तर काय अडचणी होतील हे बघणेच गंमतीचे ठरेल. यात अगदी दोन घोड्यांमधील फरक त्यातील दर्दी सोडला तर कोणालाही करता येणार नाही आणि म्हणून सर्वसाधारणपणे ओळखले जात असल्याने चलनासाठी पैसे लोकप्रिय झाले.

## ग. पैसे - सगळ्या समाजात मान्यता पावलेले असे चलन

पैशाचा व्यवहारात सहजरित्या उपयोग होतो तसेच समाजात देवाण घेवाणासाठी त्याचा उपयोग होत असल्याने त्याला सगळ्या समाजात मान्यता पावलेले असे चलन मानतात. मध्यंतरी सोन्याचे मूल्य वधारत असल्याने सोने बाळगणारी माणसे होती. मात्र बाजारात सोने देऊन कोथिंबीर घेता येत नाही त्यामुळेच पैसे हे चलन आहे की घेणाऱ्यालाही त्याचा इतर गोष्ट घेण्यासाठी उपयोग होऊ शकतो.

## ह. पैसे - सहजगत्या मोजता येते असे चलन

पूर्वी भारतात ६ पैसे म्हणजे १ आणा व १६ आणे म्हणजे १ रूपया असे दरांचे चलन अस्तित्वात होते. चार आणे, आठ आणे आजही आहेत मात्र आज पूर्वीची पद्धत बाद करीत डेसिमल पद्धतीचा वापर करीत १०० पैसे म्हणजे १ रूपया असा सोपा समजणारा पैशातील व्यवहार अस्तित्वात आला आहे. त्यामुळे पैसे हे सहजरित्या मोजता येणारे व हिशोबास सोपे असणारे चलन ठरले.

## य. पैसे - सहजगत्या इतर साधनात न मोडता खपले जाणारे चलन

आज धनादेशाद्वारे काही व्यवहार केला तर तो आधी रूपयाच्या साधनात मोजला जातो व मग त्याचा व्यवहार होतो. मात्र पैसे हे थेट सहजगत्या इतर साधनात न मोडता खपले जाणारे चलन ठरते.

## ज. पैसे - सहजरित्या कोणालाही तयार न करता येणारे असे चलन

पैसे हे त्या त्या देशातील टांकसाळीत तयार केले जाते. सहसा खोट्या नोटा चलनात येऊ नये म्हणून अनेक गोष्टी नोटात असतात. उदा. नोटेतील तार, वेगवेगळ्या ठिकाणी असणारे वॉटरमार्क, विशिष्ठ कागद, खाणा-खुणा. त्यामुळे नोटा कोणीही सहजरित्या घरी बनवू शकत नाही. खोट्या नोटा चलनात आल्या तर चलनवाढ होते व शेवटी लोकांचा पैशांवरचा विश्वास उडू लागतो आणि याचसाठी प्रत्येक देश त्या बाबत सतर्कता बाळगतो.

### ल. पैसे - नाणी व कागदी चलन

पैसे प्रथम नाण्यांच्या रूपात आले. दगड, विविध धातूंची नाणी वस्तू संग्रहालयात आजही पाहायला मिळतात. भारतात अनेक वर्षे चांदी व सोन्याची नाणी ज्यास सुवर्णमुद्रा वा सुवर्ण मोहरा असे म्हणायचे. त्यांची किंमत वस्तूंसाठी चलनात वापर व्हायची. ब्रिटिश काळातील चांदीचा रूपया लोकप्रिय होता. मात्र धातूंच्या किंमती वाढू लागल्याने तसेच चलनवाढ व महागाईमुळे नाणी ही आज लहान सहान वस्तू खरेदी करण्यासाठीच उरली आहेत. आज सर्वमान्य आहेत ते कागदी रूपये जे १, ५, १०, ५०, १००, ५०० व १००० अशा रूपात अस्तित्वात आहेत. नाणी ही टिकण्यास उत्तम आहेत मात्र मोठा व्यवहारास ती अडचणीची ठरतात. कागदी पैसे याच्या उलट टिकण्यास वाईट, कुठेही फाटणार मात्र मोठ्या व्यवहारात उपयोगाची ठरतात.

### म. आधुनिक युगातील चलन - प्लास्टिक मनी

वरील नाणी व कागदी चलनाचे असे दोघांचेही फायदे आधुनिक युगातील चलन - प्लास्टिक मनीत पाहावयास मिळतात. त्याच बरोबर इतरही फायदे प्लास्टिक मनीत पाहावयास मिळतात. प्लास्टिक मनी म्हणजेच क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, इ. ज्या मध्ये त्या त्या माणसाची ओळखही कार्ड सोबत असते. त्यामुळे १०० ची नोट हरवली तर ती विसरावी लागते व ज्याला ती मिळते तो तिचा सहज विनियोग करू शकतो. मात्र प्लास्टिक मनीत हे शक्य नसते. त्या माणसाचा फोटो, सही व माहिती त्या कार्डासोबत असल्याने सहजरित्या दुसरा ते वापर करू शकत नाही. तसेच प्लास्टिक मनी हरवल्यास लगेच त्या त्या बँकेस/संस्थेस कळवून तुम्ही कार्ड ब्लॉक करीत त्याचा चलनासाठी होणारा वापर त्वरित थांबवू शकता. तसेच तुम्ही प्लास्टिक मनीचा वापर करून केलेल्या खर्चाची माहिती तख्ता त्या त्या बँकेकडून मिळवू शकता व आपण कुठे काय व कधी पैसे खर्च केले ते त्याला कळते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्लास्टिक मनीत तुमच्याकडे पैसे नसतानाही क्रेडीट कार्डाचा वापर करून तुम्ही खर्च करू शकता व त्यामुळे बाजारास अधिकची चालना मिळते. त्यामुळेच प्लास्टिक मनी यास आधुनिक युगातील चलन असे म्हटले जाते.

***

प्रकरण - २

# प्लास्टिक मनी म्हणजे काय ? व विविध प्रकारची कार्डे

## i. प्लास्टिक मनी म्हणजे काय ?

प्रत्यक्ष पैशाची आदान-प्रदान न होताही बँकेने दिलेल्या कार्डच्या मदतीने वस्तू/सेवा खरेदीपासून पैसे काढता येण्यापर्यंतचा वापर करता येण्यासाठी केलेली सोय म्हणजेच प्लास्टिक मनीचा वापर.

प्लास्टिक मनी अर्थात उधारीवर किंवा प्रत्यक्ष पैसे बरोबर न घेताही ज्यायोगे सहजरित्या व्यवहार करता येते असे एक साधन त्यामुळे थोड्याच कालावधीत ते लोकप्रिय झाले.

प्लास्टिक मनीमध्ये गरजेनुसार बदल घडत गेले. खऱ्या अर्थाने दुसऱ्या जागतिक युद्धात जर्मनीने पैसे नसतानाही व्यवहारासाठी कागदी वेगळ्या नोटा छापल्या व त्याचा वापर बलवान होण्यासाठी केला. त्याचवेळेस पैशांची चणचण मंदीमुळे सर्वच देशात जाणवू लागली होती. छोट्या व्यापारांना व्यवहारासाठी नजिकच्या काळात लागणारे उधारीचे पैसे मिळवण्याचे साधन म्हणून अमेरिकेत १९४७ साली समाजासाठी उधार मिळवण्याच्या सोईसाठी ' चार्ज इट ' हे ब्रुकलीन, न्यूयॉर्क येथे पहिले प्लास्टिक मनी वापरात आले त्यानंतर इतर बँकांनी १९५२ सालापर्यंत आपापले प्लास्टिक मनी वापरात आणण्यास सुरू केली. मात्र १९५५ नंतर